ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

**18.**

# कौटुंबिक हिंसाचार : अपेक्षा आणि वास्तव

**- डॉ. अंजली जोशी - टेंभुर्णीकर**

महाराष्ट्र राज्याच्या गुन्हेगारीचा आढावा घेणारा 'महाराष्ट्रातील गुन्हेगारी २०१६' चा अहवाल प्रकाशीत करण्यात आला आहे. त्यामध्ये महिलांच्या अत्याचारासंबंधी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. राज्यात २०१४ मध्ये महिलांच्या संदर्भातील २६,१२८ गुन्हे दाखल झाले होते. त्यामध्ये २०१६ मध्ये सव्वादोन टक्के वाढ झाली. दोन वर्षात २६,६३६ गुन्हे दाखल झाले आहेत. बलात्काराच्या एकूण ३४६५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. सोळापेक्षा कमी वयाच्या अकराशे मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यानंतर १६-१८ वयोगटातील ६२८ तर १८-३० वयोगटातील १२६९ तरूणींवर बलात्कार झाला आहे. ४६-६० वयोगटातील ११२ महिलांना बलात्काराच्या आपत्तीला सामोरे जावे लागले आहे. विनयभंगाच्या गुन्ह्यातही वाढ झालेली दिसते. गेल्या वर्षभरात छेडछाडीचे १५७५ गुन्हे दाखल आहेत. स्त्रियांना आत्महत्येला प्रवृत्त केल्याचे ९८६ गुन्हे दाखल झाले आहेत. या प्रकारच्या बातम्या साधारण बातमीसारख्या वाचल्या आणि ऐकल्या जातात. वाढता हिंसाचार आणि सामाजिक समस्यांबद्दलची वाढती उदासीनता याला कारणीभूत आहे. त्यातून स्त्रियांची मानसिकताच अशी घडवली जाते की, बहुतांश स्त्रिया हे आत्याचार सहन करत जातात.

**कौटुंबिक हिंसाचाराच्या अभ्यासाचे महत्व :**

भारतात १९८३ मध्ये प्रथम कौटुंबिक हिंसाचाराला गुन्हा मानण्यास सुरूवात झाली. '४९८ अ' या कलमाखाली नव-याने किंवा त्याच्या नातवाईकांनी केलेल्या अत्याचाराला गुन्हा मानण्यात येउ लागले. परंतु या समस्येत अतिशय गुंतागुंत आणि स्त्रियांच्या सुरक्षिततेची निवड लक्षात घेऊन २००६ साली कौटुंबिक हिंसाचाराविरोधी स्त्री संरक्षण कायदा अस्तित्वात आला. परंतु अशा घटनांची नोंद घेऊन तितकेच अवघड होते. एकतर हिंसाचाराबद्दलच्या कल्पना व्यक्तिसापेक्ष असतात. आपल्यावर अन्याय होतोय हेच बहुतांश घटनांमध्ये स्त्रियांना वाटत नाही. शिवाय घरातील कटकटी चव्हाट्यावर आणण्याची अनिच्छा यामुळे स्त्रिया 'झाकली मूठ सव्वालाखाची' असे म्हणत मुकाट अन्याय सहन करतात. तिसरी महत्वाची बाब म्हणजे घरातल्या गोष्टी बाहेर गेल्यामुळे अजून पुढे होणा-या त्रासाबद्दलची भीती त्यांच्या मनात असते. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराला गुन्हा मानून त्याअंतर्गत स्त्रियांना संरक्षण देण्याचा प्रयत्न किती यशस्वी ठरेल हे एक आव्हानच आहे.

**कौटुंबिक हिंसाचाराचा कायदा (२००६) :**

**उद्देश :**

महिलांना सर्वात जास्त त्रास घरातल्या घरात पतीकडून किंवा त्याच्या किंवा तिच्याही नातेवाईकाकडून होतो व त्यासाठी दाद मागणे जवळजवळ अशक्य असते. यातून मार्ग शोधण्यचा प्रयत्न म्हणून सदरचा अधिनियम अस्तित्वात आला. कौटुंबिक हिंसाचार हा मानवी हक्काशी निगडीत प्रश्न असून तो विकासाच्या मार्गातील अडसर आहे. त्यामूळे त्यापासून महिलांचे संरक्षण करणे हा प्रमुख उद्देश यामागे आहे.

कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना सार्वत्रिक असल्या तरी त्या अदृश्यच राहतात. एखाद्या महिलेवर स्वकियांनी अत्याचार केल्यास भारतीय दंडसंहितेच्या कलम ४९८ अ नुसार तो गुन्हा ठरतो. मात्र दिवाणी कायदे या घटनांवर सखोल चर्चा करत नाहीत. म्हणून दिवाणी कायद्यान्वये कौटुंबिक हिंसाचाराला प्रतिबंध घालण्याचा उद्देश यामागे आहे.

महिलेचा छळ करणारी व्यक्ती एकाच घरात राहात असेल त्यांच्यात रक्ताचे , विवाहातील नात्याचे, दत्तक विधानाने आलेले संबंध किंवा एकत्र कुटुंबातून निर्माण होणारे नातेसंबंध असतील तर त्यांचा अंतर्भाव या कायद्याच्या कक्षेत होतो.

**कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ :**

कलम ३ अंतर्गत कौटुंबिक छळ म्हणजे शारीरीक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ ज्यामध्ये अपमान, शिविगाळ, हिणवणे, धमकावणे आणि तिच्या हक्काच्या मालमतेपासून तिला वंचित ठेवणे, घराबाहेर हाकलणे अशा बाबींचा सामावेश होतो. कौटुंबिक हिंसाचाराच्या अंतर्गत एखाद्या स्त्रीने तक्रारी केल्यास तिला आर्थिक मदत, संरक्षण, अपत्याचा ताबा व नुकसानभरपाई मिळू शकते आणि तिच्यावर अन्याय करणाऱ्याला शिक्षा केली जाते. शारीरीक छळाच्या अंतर्गत स्त्रीला कमी लेखणे किंवा लैंगिक छळ करणेही गुन्हा आहे.

**अपेक्षा व वास्तव :**

कुटुंबात आणि समाजात पसरलेल्या असमानतेशी आणि या असमानतेबरोबर येणा-या श्रेष्ठत्व कनिष्ठत्वाच्या मानसिकतेशी हा मुद्दा निगडीत आहे. परंपरेने आलेली पुरूषी श्रेष्ठत्वाची मानसिकता ही जशी पुरूषामध्ये रूजलेली दिसते. तशीच आपण दुय्यम आहोत ही भावना स्त्रियांच्या मनात रूजलेली दिसते. पुरूष स्त्रियांवर अन्याय अत्याचार करतात यात त्यांना जसे गैर वाटत नाही. तसे जिच्यावर अन्याय अत्याचार होतो तिलाही गैर वाटत नाही. आणि वर्षानुवर्षे अत्याचाराची परंपरा चालू रहाते.

हिमाचल प्रदेशातील एका अदिवासी जमातीत मातृसत्ताक पद्धती आहे. तिथे स्त्रिया अर्थाजन करतात. पुरूष घरकाम करतात. संध्याकाळी घरी येऊन त्या पुरूषांना मारहाण करतात. असा उल्लेखही वाचनात आला. याचा अर्थ ज्याच्या हातात सत्ता किंवा पैसा आहे. तो श्रेष्ठ आणि तो अत्याचाराचा अधिकार वापरणार, मग भलेही ती स्त्री असो वा पुरूष.

कौटुंबिक हिंसाचाराची पाळे मुळे स्त्री पुरूष असमानतेशी निगडीत आहेत्. राज्याच्या गुन्हेगारीचा आढावा घेणारा महाराष्ट्रातील गुन्हेगारी २०१४ चा अहवाल असे सांगतो की, राज्यात २०१३ मध्ये महिलां संदर्भात २६,१२९ गुन्हे झाले होत त्यात २६,६९३ गुन्हे दाखल झाले आहेत. २०१४ मध्ये बलात्काराच्या एकूण ३,४६५ गुन्ह्यांची नोंद झाली. १६ पेक्षा कमी वयाच्या ९९०० मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे गुन्हे दाखल आहेत. त्यानंतर १६-१८ वयोगटातील ६२८ तर १८-३० वयोगटातील १२६९ तरूणींवर बलात्कार सामोरे जावे लागले आहे. एवढेच नाही तर ६० वर्षाहून अधिक वयाच्या ९ महिलांनाही या घृणास्पद प्रकाराला सामोरे जावे लागले. विनयभंगाच्या गुन्ह्यातही ३२% वाढ झाली. एका वर्षात महिलांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचे ९८६ गुन्हे दाखल झाले आहेत. दाखल न झालेल्या गुन्ह्याचा अजून वेगळा विचार करावा लागेल. याचा अर्थ स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे हा पूर्वापार समज आजही तसाच आहे.

स्त्री अत्याचाराच्या घटना एवढ्या मोठ्याप्रमाणात वाढण्यामागे पुरूषी मनोवृत्तीचा अधिक प्रभाव मोठ्याप्रमाणात वाढण्यामागे पुरूषी, मनोवृत्तीचा अधिक प्रभाव असल्याचे लक्षात येते. बहुतांश कुटुबातून स्त्रियांप्रती पुरूषांची वागणूक ही अरेरावीची अन्यायाची असते. म्हणूनच कायदा सर्वव्यापी व कडक करावा लागला. ज्या कुटुंबातून स्त्री आणि पुरूष यांचे नाते समान पातळीवरच असते अशी मोजकीच कुटुंबे समजात आढळतील.

**कायद्याचे स्वरूप (२००६ पासून ) :**

कौटुंबिक हिंसाचार कायद्याची व्याप्ती वाढवली गेली आहे. शारीरीक, शाब्दिक लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, शिवीगाळ, अपत्य नसण्यावरून तिला धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे, पिडीत व्यक्तीचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे हुंडयाची मागणी करणे, आर्थिक छळ करणे, घराबाहेर काढणे या सर्व बाबी हिंसाचारात मोडतात. हे अन्याय होत असताना स्त्री सहन करते किंवा उलटून उत्तर देते. उलट उत्तर दिल्यास तिला अधिक त्रास सहन करावा लागतो परतु कायदा / अन्यायाचा प्रतिकार असूनही ज्याचे संरक्षण मिळवण्याचा प्रयत्न फार कमी प्रमाणात स्त्रिया करतात. वास्तवात कायद्याचा आधार घेऊनच करता येऊ शकतो. नवऱ्याकडून उपजिविकेसाठी खर्च मागता येतो. वैद्यकीय उपचाराचा खर्च मागता येतो. मानसिक त्रास झाला असल्यास नुकसान भरपाई मागू शकतात. कायेदेशीर सल्ला, वैद्यकीय सुविधा, निवासगृह अशा सेवा मोफत

मिळतात. भारतीय दंड संविधान ४९८ अ कलमाखाली पोलिसात तक्रार दाखल करू शकता. यासंदर्भात स्वत: पिडितेनेच पोलिसात तक्रार दाखल करावी असे नाही. तिच्या वतीने तिचे कोणीही नातेवाईक , स्नेही वा १८ वर्षाखालील मुले या विषयी दाद मागू शकतात.

महाराष्ट्रात सध्या ३७७४ संरक्षण अधिकारी कार्यरत आहेत. महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना संरक्षण अधिकारी म्हणून घोषित केले आहे. प्रत्येक जिल्ह्यात त्यांचे कार्यक्षेत्रही निश्चित केले आहे परस्परांना पडलेल्या कार्यक्षेत्रातील संरक्षण अधिकारी कोण आहेत, त्याचा पत्ता वा दुरध्वनी क्रमांक त्यांची माहिती मिळवण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. अत्याचार ग्रस्त महिलांसाठी मोफत समुपदेशन केले जाते. ज्याचा न्याय लाभ महिला घेऊ शकतात.

परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की , कौटुंबिक हिंसाचार बहुतेकवेळा लपवला जातो. स्त्रिया अशा बाबी जवळच्या कडे उघड करत नाहीत. पोलीसांची वा संरक्षण अधिका-यांची मदत घेत नाहीत. इतकेच काय समुपदेशनासाठीही जात नाहीत. आपल्या मुलांनाही त्या सहन करण्याचेच धडे देतात.

बऱ्याचदा आपण अत्याचारग्रस्त आहोत याचीच जाणिव पिडीतेला नसते आणि अनेकदा कायद्यावरही विश्वास नसतो. न्याय मिळेल का ? लवकर मिळाला नाही तर ? रहायचे कुठे ? असंख्य प्रश्नांच्या समोर असतात. परंतू शासनाने त्यासाठी आश्रयगृह स्थापन केले आहे आणि न्यायालयाने ६० दिवसात अर्जावर निकाल देणे अपेक्षित आहे. या कायद्याअंतर्गत नमूद सर्व गुन्हे अजामीन पात्र व दखलपात्र आहेत. अन्यायग्रस्त स्त्रिया राज्य महिला आयोगाकडेही दाद मागू शकतात.

**वस्तुस्थिती :**

वरील प्रकारचे हिंसाचार भोगलेल्या स्त्रियांचे प्रमाण भारतात जवळपास ४० टक्के आहे. बिहार व राजस्थानमध्ये हे प्रमाण खूपच जास्त आहे. (५०-६० टक्के) उत्तर प्रदेश व मध्य प्रदेशात त ४०-५० टक्के आहे. हिमाचल प्रदेश ७ टक्के , जम्मू कश्मीर १५ टक्के, कर्नाटक २१ टक्के , मार्क्सवादाने प्रमाणित पश्चिम बंगालमध्ये हे प्रमाण ४२ टक्के आहे. तर स्त्री सक्षमीकरणात आघाडीवर असणा-या तामिळनाडूत हे प्रमाण ४५ टक्के आहे. स्त्री उद्धाराची परंपरा असलेल्या महाराष्ट्रात हे प्रमाण ३३ टक्के आहे.

**हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची वास्तविकता :**

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेत कार्यरत असणा-या संजिवनी मुळये यांनी केलेल्या सर्वेक्षणाची आकडेवारी असे सांगते की, जात, धर्म, स्थान यामुळे हिंसाचारात फार पडत नाही. शहरी-ग्रामीण, सवर्ण दलित पुरूषी अरेरावीत फार फरक नाही. परंतु शिक्षण आणि उत्पन्न याचा निश्चित परिणाम हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ किंवा घट होण्यावर होतो. त्या सर्वेक्षणानुसार,

०१. जात - धर्म-भूप्रदेश यांचा फारसा परिणाम हिंसाचाराच्या प्रमाणावर जाणवत नाही. हिंसाचाराचा संबंध पुरूषी अरेरावाशी निगडीत आहे.

०२. शिक्षणाचा संबंध हिंसाचाराच्या घटना कमी करण्यावर होताना दिसतो. उच्चशिक्षितांमधील सावध प्रतिसादामुळे हा फरक दिसतो.

०३. आई - वडीलांमध्ये हिंसाचार होत असेल तर तो पुढच्या पिढीत दिसून येण्याचे प्रमाण मोठे असते.

०४. मुलामुलींची मानसिक जडणघडण कशी कशी होते यावर हिंसाचार अवलंबुन असतो. समानतेची तत्वे जेथे रूजलेली असतात तेथे हिंसाचार दिसत नाही.

०५. नव-याला असणारे दारूचे व्यसन हिंसाचाराला कारणीभूत ठरते.

०६.स्त्री शिक्षणाचे वाढते प्रमाण व प्रभाव हासुद्धा हिंसाचार वाढण्यावर परिणाम करणारा घटक आहे. नव-यापेक्षा जास्त शिकलेली बायको असेल तर हिंसाचाराचे प्रमाण वाढते असते.

०७. नव-याची संशयी वृत्ती हा घटक हिंसाचार वाढवणारा सर्वांत मोठा घटक आहे.

०८. पत्नीला मारणे जितके संमर्थनीय तितका हिंसाचार जास्त वाढतो.

०९. निर्णय प्रक्रियेला स्त्रियांचा सहभाग व शरीरसंबंधात नकार यानेही हिंसाचार वाढतो. पत्नी जास्त सक्षम असेल तर तिला दडपण्याचा पुरूषी खटाटोप जास्त वाढतो.

१०. पुरूषी अहंकार जेवढा दुखावला जाईल तेवढा छळवाद जास्त वाढतो. पुरूषाच्या ' अरे' ला 'कारे' ने उत्तर देणारी स्त्री हा छळवाद जास्त भोगते.

११. नव-याने घातलेले निर्बंध, पितृसत्ताक पद्धतीतून आलेली स्त्री दुय्यमत्वाची मानसिकता आणि आजही आपल्याकडे कमीपणा घेण्याची स्त्रीची दुर्बलता निश्चितपणे हिंसाचार वाढवण्यास कारणीभूत ठरतात.

१२. स्त्रियांचे परावलंबित्व यामुळे त्या हिंसाचाराला बळी पडतात.

१३. भारतामध्ये हुंडाप्रथा ही मोठ्या प्रमाणावर कौटुंबिक हिंसाचाराला प्रोत्साहन देणारी प्रथा आहे. भारतात १९६१ पासून हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला आहे, असे असले तरी हुंडा देणे व घेणे हा गुप्त वा उघड व्यवहार बनला आहे. जेथे वरपक्ष वधूपक्षाकडे हुंड्याची मागणी करून वधूचा शारीरिक व मानसिक छळ करतो. भारतात प्रत्यक वर्षी ६००० पेक्षा जास्त हुंडाबळी होतात.

१४. कुटुंबात स्त्रियांशी केले जाणारे वर्तनही यासंदर्भात तपासणे गरजेचे आहे. पत्नीला मारहाण करणे, शिवीगाळ करणे हा अनेक कुटुंबाचा नित्याचा भाग असतो. बहुतांश स्त्रिया हे वर्तन सहन करतात. आपण पिडले जातोय ही भावनाही त्यांच्या मनात निर्माण होत नाही. या वर्तनाची कुठेही दखल घेतली जात नाही. स्त्रियांना सुरक्षेचा अभाव किंवा न्यूनगंड यामुळे स्त्रिया अन्याय सहन करत जातात. नवीन पिढीतील मुलांनाही हेच शिकायला मिळते आणि पिढ्यानपिढ्या अत्याचार चालूच राहतात.

१५. समाजाच्या निम्न स्तरात हिंसाचाराचे प्रमाण जास्त असते. अशिक्षितता, असमानतेची वागणूक, सभ्यतेचा अभाव, गुन्हेगारी प्रवृत्ती, व्यसनाधिनता यांसारख्या कारणामुळे या स्तरात हिंसाचार वाढलेला दिसतो.

१६. उच्च शिक्षित समाजात प्रमाण कमी असले तरीही हिंसाचार आढळून येतो. त्यामध्ये स्त्री शिक्षणाचा प्रभाव पत्नीचे वेतन, व्यनाधीनता आणि पुरुषी मानसिकता ही कारणे आढळतात.

एका आय.ए.एस. अधिकाऱ्याच्या पत्नीने तिच्या पतीविरुद्ध हुंड्यासाठी छळले म्हणून पोलिसांत तक्रार दाखल केली होती. नोकरी करणाऱ्या कितीतरी उच्चशिक्षित मुलींना आपला पगार नवऱ्याच्या हातात देणे बंधनकारक असते. शिवाय तिच्या स्वतःच्या खर्चासाठी ती पैसे घेऊ शकत नाही. नवऱ्याच्या मर्जीनेच तिला तिच्या गरजा पूर्ण कराव्या लागतात. शिवाय नवऱ्याकडून वेळोवेळी होणारी मारहाण तिला सहन करावी लागते. अनेक महिला संघटना स्त्रियांच्या या अन्यायाविरुद्ध आवाज उठवतात. कायदा सक्षम आहे. तरीही कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण कमी होत नाही.

**उपाय :**

कायदा कितीही परिणामकारक केला असला तरी त्याची अंमलबजावणी जोपर्यंत परिणामकारक होत नाही तो पर्यंत हिसंचार कमी होणार नाही आणि अन्यायाविरुद्धच आवाज उठवणे गरजेचे आहे.

कौटुंबिक हिंसाचाराच्या बहुतांश केसेसमध्ये स्त्रिया मग त्या कोणत्याही स्तरातल्या असो अन्याय सहन करत राहतात. त्यामुळे अशा पुरुषांची हिंमत वाढते. बऱ्याचदा नवरा आपल्याला मारता तो त्याचा हक्कच आहे. अशा प्रतिक्रिया स्त्रियांकडून ऐकायला मिळतात. अन्याय होत असेल तर तक्रार करण्याविषयीचे प्रबोधन होणे, तिचा आत्मविश्वास वाढवणे आवश्यक आहे.

घटनेने आपल्याला दिलेले अधिकार तसेच हक्क व कर्तव्याची जाणीव प्रत्येक नागरिकाला असायला हवी, अन्याय करणारा व सहन करणारी दोघेही याबाबतच तितकेच दोषी मानता येतील. स्त्री-पुरुष समानेतची कास कौटुंबिक पातळीवर असणे गरजेचे आहे. भावनिक संबंधांना अधिक महत्त्व असणे गरजेचे आहे. आधुनिकतेच्या नावाखाली ज्या ज्या अनिष्ट गोष्टी अतिरेकी स्वरूपात समाजात येत आहेत त्या वेळीच थोपवणे आवश्यक आहे.

केवळ कायदा करून प्रश्न सुटणारे नाहीत. त्यासाठी या कायद्यामधील शिक्षा, तरतुदी यांचा प्रसार होणे, अनिष्ट प्रथांचे निर्मूलनासाठी पूरक योजना यांचे प्रबोधन व जनजागृती करणे गरजेचे आहे. कौटुंबिक हिंसाचार हा मानवी हक्कविषयक प्रश्न असून तो विकासाच्या मार्गातील अडसर आहे. स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल करताना हा कायदा अधिक प्रभावी व्हायला हवा.

**वस्तुस्थिती :**

अधिकाधिक पिडितांना कायद्याचे संरक्षण देणे, त्यांचा कायद्यावरील विश्वास ठाम करणे ही मुख्य जबाबदारी शासनाची, न्यायालयांची व महिला आयोगांची आहे. अशा परिस्थितीत स्त्री स्वतः आर्थिकदृष्टया स्वावलंबी असेल तर ती संरक्षण मागण्याचे धाडस करू शकते. म्हणून स्त्रीयांचे सक्षमीकरण ही आज काळाची मोठी गरज निर्माण झाली आहे तिने सक्षम  होणे आवश्यक आहे. ज्याच्या आधारावर ती अन्यायाबाबतदाद मागू शकते. आर्थिक पाठबळ नसेल किंवा मानसिक दुर्बलता होते असेल तर दाद मागण्याची हिंमत स्त्रिया करत नाही. कौटुंबिक हिंसाचार कायदा हा स्त्रियांना आधार वाटायला हवा.

**संदर्भ :**

०१. 'माझ शरीर माझा हक्क' लोकसत्ता : चतुरंग, ५ नोव्हेंबर २०१६.
०२. भारतीय स्त्री, लिंग अनुपात एवं सशक्तीकरण, कृपा गौतम, मिश्रा पब्लिकेशन, दिल्ली.
०३. 'महिला सशक्तीकरण और कानून' सरस्वती प्रकाशन कानपूर, २००८.
०४. स्त्री प्रश्नाची वाटचाल, परवर्तनाच्या दिशेने, विद्युत भागवत, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
०५. कौटुंबिक हिंसाचार कायदा : महिला व बालकल्याण प्रकाशन.
०६. कौटुंबिक हिंसाचार वाढतोय : संजीवनी मुळ्ये, पुणे.

❑❑❑